## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. २८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०१/२०१८

**१) ट्रॅक्टरची बॅटरीची चोरी :–**

दिनांक १२/०१/२०१८ चे रात्र दरम्यान यातील कोणीरती अज्ञात आरोपीने कोणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घरा समोरील खुल्या जागेत ठेवलेल्या ट्रॅक्टरची टाटा कंपनीची बॅटरी क्र. ७५८१२३ जे ६०५६३ किंमती ४,०००/–रु. ची चोरुन नेल्याने फिर्यादी दिनेश माधोराव कावळे वय ३५ वर्ष, रा. करडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**२) टाटा मिनी ट्रक चालकाने ईलेक्ट्रीक पोलला धडक मारुन नुकसान करुन ट्रक सोडुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०१/२०१८ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील अनोळखी ट्रक मिनी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन रोडच्या बाजुला असलेल्या ईलेक्ट्रीक पोलला धडक मारुन विदयुत विभागाचे नुकसान करुन ट्रक सोडुन पळुन गेल्याने ट्रक मध्ये टायगर ब्रॅन्ड देशी दारुचे ३९० बॉक्स प्रत्येक बॉक्स मध्ये ९० एम एल देशी दारुने भरलेल्या प्लास्टीक शिस्या एकुण ३९,०००/–रु. पव्वे किंमती १,१४,०००/–रु. चा माल व टाटा मिनी ट्रक क्र. एम. एच. ३१ डी ८८७८ किंमती १,००,०००/–रु. असा एकुण २,१४,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी चौधरी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,४२७ भादवी. सहकलम ६५(अ)(ई) मदाका सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. ताजने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) जनावरांची हत्या करुन व जवळ मास बाळगुन साहित्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०१/२०१८ चे १३.२० वाजता. पुर्वी यातील आरोपीने गाय जातीचे जनावरांची हत्या करुन जवळ मास बाळगुन मिळुन आल्याने त्याचे पासुन ५१ किलो ४०० ग्रॅम गौमास, १ लाकडी कुंदा, १ मास कापण्याची लोखंडी सुरी असा एकुण ५,२००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. खाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ भादवी. सहकलम ५ (क)९(अ) म.प्रा.सं. अधि १९७६ (सन २०१५ चे महाराष्ट्र अधीनीयम क्र. ०५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) जनावरांची कत्तल करण्याचे उद्येशाने रुम मध्ये निर्देतेने कोंबुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०१/२०१८ चे १८.०० ते १९.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने जनावारांची कत्तल करण्याचे उद्येशाने १६ जनावरे ज्यात ११ लहान गोरे, २ गायी व ३ लहान गोऱ्या एकुण किंमती ४०,०००/–रु. तसेच त्यांच्या चाऱ्या पाण्याची सोय न करता अंदाजे १० बाय ०७ चे रुम मध्ये निर्देतेने कोंबुन ठेवल्याचे मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. गदादे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड) प्राण्यांना कृतेने वागविणे सहकलम ५(क) ९ महाराष्ट्र प्राणी अधीनीयम प्राणी संरक्षण कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. .

**५) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १४/०१/२०१८ चे १९.०० ते १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी माधवराव रामभाऊ रोकडे वय ४९ वर्ष, रा. रेंगाटुर जि. नागपुर यानी आपली बजाज प्लॉटीना मोटार सायकल क्र. एमएच ३१ बीझेड ९५७१ किंमती २०,०००/—रु. ही श्लोक हॉस्पीटलचे पार्कींगचे ठिकाणी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आतराम. पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक १४/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, वरठी, साकोली, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी दारू किंमती २७५०/—रु. ५६ लिटर ४० मिली लिटर देशी/ विदेशी दारु + मोटार सायकल किंमती ३३,६६५/—रु. तसेच जुगारातुन किंमती २६५५/—रु. असा एकुण किंमती ३९,०७०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.